**नियमित फौजदारी खटला क्रं.२०३/२०२६**
**नि.क्रं.०६**
कल्याण लोहमार्ग पोलिस ठाणे गु.रं.नं.५९/२६

MHTH110032132026

: **न्या य नि र्ण य** :
( दिनांक १३ मार्च २०२६ रोजी घोषित )

१. प्रस्तुत प्रकरण आरोपी **विशाल महेंद्र काकडे** विरुद्ध प्रस्तुतचे दोषारोपपत्र कल्याण लोहमार्ग पोलिस यांनी भारतीय न्याय संहिता कलम ३०३(२) अन्वये दाखल केले आहे. आज रोजी दि.१३/०३/२०२६ रोजी आरोपीला आधारवाडी कारागृहातुन न्यायालयात हजर केले असता त्याने स्वत:हून गुन्हा कबूल केलेला आहे. त्याप्रमाणे आरोपीविरुध्द नि.०४ कडे दोषारोप ठेवला. आरोपीने स्वत: हून गुन्हा कबूल केला तसे निवेदन नि.०५ कडे दिले. आरोपीने स्वखुशीने गुन्हा कबूल केल्याबाबत मी खात्री केली. तसेच आरोपीचे शिक्षेबाबत म्हणणे ऐकले.

२. प्रस्तुत प्रकरणात दिनांक २१/०१/२०२६ रोजी २३.३० वा. ते दिनांक २२/०१/२०२६ रोजी ०४.०० वा. चे सुमारास फिर्यादी भुपेंद्र विक्रम सिंग हे कल्याण रेल्वे स्टेशन असा फलाट क्र. ०४/०५ वर मधल्या ब्रिजखाली झोपले असातना आरोपीने फिर्यादी यांचे नेसते पॅन्टचे उजवे खिशातील मोबाईल फोन चोरी केला. त्यामुळे आरोपीला अपराधी परिविक्षा अधिनियमातील तरतूदींचा लाभ देणे योग्य होणार नाही. आरोपीने आज रोजी सदरचा गुन्हा कबूल करून त्याचे कुटुंबीय त्याचेवर अवलंबून असल्याचे कथन करून कमीत कमी शिक्षा देण्याची विनंती केलेली आहे. आरोपी हयाचे वय २७ वर्षे असल्याचे दिसून येत आहे. आरोपी दिनांक २२/०१/२०२६ पासुन आजपर्यंत म्हणजेच ०१ महिने १९ दिवस कारागृहात आहे. सबब, हया सर्व बाबींचा विचार करता खालील प्रमाणे आदेश पारीत करण्यात येत आहे.

<u>**आदेश**</u>

| | |
|---|---|
| १) | **आरोपी विशाल महेंद्र काकडे** हयास प्रस्तुत खटल्यात भारतीय न्याय संहिता कलम ३०३(२) च्या गुन्हयासाठी भारतीय नागरिक सुरक्षा संहिता कलम २६४ अन्वये दोषी ठरविण्यात येते. |
| २) | आरोपी भारतीय न्याय संहिता कलम ३०३(२) च्या गुन्हयासाठी **तीन महिने** साध्या कारावासाची शिक्षा ठोठावण्यात येते. |
| ३) | भारतीय नागरिक सुरक्षा संहिता कलम ४६८ अन्वये आरोपीने न्यायालयीन बंदी असतांना भोगलेल्या शिक्षेची सदर शिक्षेतुन सुट देण्यात येते. |
| ४) | आरोपीला निकालपत्राची छायाप्रत विनामुल्य व त्वरीत देण्यात यावी. |
| ५) | प्रस्तुत प्रकरणात जप्त करण्यात आलेला विवो कंपनीचा ग्रे रंगाचा मोबाईल फोन हा फिर्यादी हयांना दिलेला आहे. अपील कालावधनंतर सदर मोबाईल फोनचा ताबा कायमस्वरुपी करण्यात यावा. |
| ६) | प्रस्तुत प्रकरण निकाली काढण्यात आले. |

VISHWAS PANDURANG SHINDE

Digitally signed by VISHWAS PANDURANG SHINDE
Date: 2026.03.11 18:55:12 +0530

(व्ही.पी.शिंदे)

कल्याण
दिनांक : १३/०३/२०२६

न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग लोहमार्ग
लोहमार्ग न्यायालय, कल्याण